# उपवनसंरक्षक सिरोंचा वन विभाग, सिरोंचा यांचे कार्यालय

असरअल्ली रोड, सिरोंचा (महाराष्ट्र)

दूरध्वनी कमांक 07131–233009, फॅक्स नंबर 233009 इमेल dycfsrc@gmail.com

विषय– Submission of Draft Proposal Part I under section 2(ii) for diversion of Forest Land for the project "Up-gradation to 2/4 lane with paved shoulder configuration of Gadchiroli-Sironcha of NH-353 C in the State of Maharashtra by Ministry of Road Transport and Highways from Ashti to Sironcha.

कमांक कक्ष–3(2)/स–1/459
सिरोंचा, दिनांक – 15/07/2021

प्रति,

कार्यकारी अभियंता
राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम,
विभाग, गडचिरोली

संदर्भ– 1) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम, विभाग, गडचिरोली यांचे कार्यालयाचे पत्र कमांक 3205/एफडीपी/2020 दि.28.12.2020 प्राप्त दिनांक 07/05/2021

उपरोक्त विषयांकित प्रस्तावाचे प्रस्तावीत वनक्षेत्राची दिनांक 09.07.2021 रोजी मौका पाहणी करीता सवक्षरीकर्ते गेले असता खालील आक्षेप असल्याचे दिसुन आले.

1) प्रस्तावीत क्षेत्राची **alignment** रस्त्याचे दोन्ही बाजुने 11 मीटर रूंदीत 100 मीटर अंतरावर पिल्लर रोवुन पक्का केलेला नाही.

2) काही ठिकाणी **alignment** रस्त्याचे दोन्ही बाजुने 9 मीटर रूंदीत पिल्लर रोवल्याचे दिसुन आले.

3) प्राणहिता अभयारण्य क्षेत्रा सबोवताल पर्यावरण संवर्धण राखीव क्षेत्र समाविष्ठ होत असल्याने क्षेत्र विवरण तक्ता मध्ये सदर क्षेत्र वेगळयाने दर्शविले नाही.

4) प्राप्त नकाशामध्ये पर्यावरण संवेदनशील क्षेत्र वेगळया रंगाने दर्शविलेला नाही.

5) पुल बांधकाम करावयाचे असल्यास डायव्हर्शन रस्ता दर्शविले नाही.

6) डायव्हर्शन रस्ता ठिकाणी 10 मीटर अंतरावर पिल्लर उभारावे.

7) वळण रस्त्याचे ठिकाणी 10 ते 20 मीटर अंतरावर पिल्लर उभारावे.

8) या कार्यालयाचे पत्र कमांक 436 दि. 13.07.2021 अन्वये दिलेल्या सुचनेप्रमाणे केएमएल फाईल तयार करून सादर करावे.

तरी वरील पुर्तता करून त्वरीत सादर करावे. जेणेकरून सदर प्रस्तावीत क्षेत्राचे मंजुरीकरीता प्रस्ताव वरीष्ठांना सादर करण्यास सुलभ होईल.

(सुमीत कुमार भा.व.से.)
उप वन संरक्षक
सिरोंचा वन विभाग, सिरोंचा

प्रतिलीपीः– विभागीय व्यवस्थापक प्राणहिता वन प्रकल्प विभाग आलापल्ली यांना कळविण्यात येते की, झमेला नाला ते सिरोंचा रस्ता बांधकाम करीता संदर्भिय प्रत्रान्वये 22 मीटर रूंदीत वनक्षेत्राचे मागणी केले आहे. प्रकल्प यंत्रणे कडुन प्रस्तावीत क्षेत्राची **alignment** करून देतील प्रस्तावीत क्षेत्राची हदद निश्चित केलेल्या क्षेत्रामधिल वनखंड नुसार वृक्षाची वेळीवर्ग निहाय झाडाची यादी व झाडांची गोषवारा सादर करावे. तसेच प्रस्तावीत वनखंडामधील क्षेत्राचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे.

प्रतिलीपीः– सहायक वनसंरक्षक, सर्व (प्रादे.) वनविभाग सिरोंचा यांना माहिती व उचीत कार्यवाहीस अग्रेषीत.

प्रतिलीपीः– वन परिक्षेत्र अधिकारी, कमलापुर, प्राणहिता, जिमलगटटा, बामणी व सिरोंचा यांना कळविण्यात येते की, प्रकल्प यंत्रणेने दाखविलेल्या **alignment** मधिल वृक्षाची वेळीवर्गनिहाय मोजणी करून वनखंड निहाय झाडाची यादी व गोषवारा तयार करून या कार्यालयास सादर करावे. प्रकल्प यंत्रणेने सदर रस्ता बांधकामकरीता 22 मीटर रूंदी मध्ये मागणी केले असल्याने **alignment** प्रत्यक्षात 22 मीटर रूदी आहे किंवा नाही याची खात्री करून झाडाची यादी तयार करावे.